**प्रेसनोट** **दि.१३/०४/२०१९**

**सिंहगडरोड पो.ठाणे**

**नऱ्हे पोलीस चौकीचे हद्दीतील सोसायटयांमध्ये कम्युनिटी पोलीसींगचे अनुषंगाने जनजागृती**

दि.१२/०४/२०१९ रोजी सिंहगडरोड पोलीस स्टेशन अंकीत नहे पोलीस चौकी प्रभारी सहा. पोलीस निरीक्षक एस.डी.पाटील व पोलीस उप-निरीक्षक एस.एस.घाडगे यांनी कम्युनिटी पोलीसींगचे अनुषंगाने नहे पोलीस चौकी हद्दीतील आदित्य संस्कृती सोसायटी बिल्डींग रहिवाशी यांची बैठक आयोजीत केली. सदर मिटींगमध्ये पुणे पोलीस आयुक्तालयाकडून कम्युनिटी पोलीसींग संदर्भात एकुण १४ ॲप/योजना कार्यान्वीत असून त्या संदर्भात उपस्थित रहिवाशी यांना माहीती सांगण्यात आली. सिंहगडरोड पोलीस स्टेशनच्या हद्दीतील रहिवाशांच्या सुरक्षेकरीता घरफोडी चोरी, चैन स्नैचींग, सायबरचे गुन्हे यासंदर्भात उपस्थित रहिवाशांना माहिती देवुन त्यांचे प्रश्न ऐकुन घेवुन त्यांचे समस्यांचे निराकरण करुन त्यांना योग्य ते मार्गदर्शन करण्यात आले. तसेच उपस्थित रहिवाशांना महिलांची व मुलांचे सुरक्षिततेबाबत योग्य त्या सुचना देण्यात आल्या. कोणत्याही अडचणी आल्यास त्वरीत सिंहगडरोड पो.स्टे. अथवा १०० नंबरवर कॉल करुन पोलीस कंट्रोल रुम येथे कळवावे. आपल्या आजुबाजूस कोणी संशयीत व्यक्ती आढळल्यास ताबडतोब पोलीसांना कळविण्यात यावे. त्यांना त्याबाबत योग्य ते मार्गदर्शन करण्यात आले. सदर मिटींगला ४० ते ५० रहिवाशी हजर होते.

